उद्यान कलेची आवड जोपासणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(प्रकाशित लोकनायक २८ ऑगस्ट २०१०)

डॉ. भीमराव आंबेडकरांना बागकामाची वा बागेची आवड होती. निसर्गाच्या सहवासात काम करण्यात त्यांना आनंद वाटत असे. रोपे, वेली, फळझाडे, फुलझाडे, मन मोहून घेणाऱ्या वनस्पती, शो ची झाडे, अशी वेगवेगळी झाडे ते आपल्या बागेत लावत असत. एखादा माळी ज्या पद्धतीने आपली बाग फुलविण्यासाठी कष्ट घेतो त्यापेक्षाही जास्त कष्ट व काळजी भीमराव आपल्या बागेबाबत लहानपणीसुद्धा घेत असे. सातारा शहराच्या पूर्वेला सातारचा कॅम्प भाग आहे. याच भागात सदरबझार वस्ती आहे आणि याच वस्तीत डॉ. भीमराव आंबेडकरांचे घर आहे. भीमराव लहान असताना त्यांनी या घरापुढे एक सुंदर अशी बाग निर्माण केली होती. त्या बागेत जाई-जुई, वेली होत्या. त्या वेली खूपच सुंदर होत्या. त्या वेली आधारासाठी शिवरी नावाच्या जुन्या झाडावर चढवलेल्या होत्या.

भीमरावांना फुलवेलींचे फार वेड होते. फुलवेली कुंडीमध्ये हौसेने लावत असत, त्यांना पाणी घालत असत. आपल्या बागेत निसर्गसंपन्न झाडे लावून ते निसर्गाच्या सौंदर्यात अधिकच वाढ करत असत. त्यांच्या घरापुढच्या बागेत पश्चिमेच्या बाजूला त्यांनी एक लिंबाचे झाड लावले होते. तसेच पूर्वेला कोपऱ्यात त्यांनी शिवरीचे झाडे लावलेले होते. घराच्या बाजूला वडाचे झाड होते. भीमराव लहानपणी काही कारणास्तव रुसल्यावर त्या झाडावर जाऊन बसायचे. त्या वडाच्या सावलीत ते सुर पारंब्या हा खेळ खेळत. त्यांनी बाल वयातही बाग इतकी सुंदर बनविली होती की, जणू काही त्या बागेतील वेली, फुले, फळझाडे कोणाचे तरी स्वागत करण्यासाठीच सज्ज आहेत की काय असे वाटत असे. लहान वनस्पती सोडल्या तर भीमरावांनी लावलेले लिंबाचे झाड, शिवरीचे झाड व इतर काही झाडे आजही त्यांच्या स्मृतीची साक्ष देत त्यांच्या घरासमोर ताठपणे उभ्या आहेत.

जेव्हा कधी बाबासाहेब ओढ्याकाठी रानात जात असत तेव्हा रानाफुलांनी डवरलेल्या झुडूपांजवळ ते कितीतरी वेळ उभे राहत. त्या झुडूपांवरील फुले तोडून घेत. रानफुलझाडे व फुलवेलींची फुले ते आवडीने गोळा करीत. कोणी त्यांना विचारल्यास ते म्हणत, "मला ही फुलझाडे राजगृहातील माझ्या बागेत लावायची आहेत." म्हणून ते फुलझाडांचे फाटे तोडून नेत. तऱ्हेतऱ्हेची झाडे-झुडपे पाहून बाबासाहेबांना जुन्या काळच्या आयुर्वेदीक औषधी शास्त्राचे स्मरण होई. झाडाझुडपांचा औषधी वनस्पती म्हणून उपयोग केला पाहिजे, असे त्यांना वाटत असे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बागकामाची खूप आवड होती. आपण स्थापन केलेल्या महाविद्यालयासमोर एक मोठी सुंदर बाग असावी, असे त्यांना वाटत असे. म्हणून त्यांनी स्वत:च त्या बागेचा नकाशा तयार केलेला होता. कोणती झाडे, कोठे व कोणत्या प्रकारे लावायची इ. बाबींचा त्या नकाशात समावेश केला होता. झाडे, वृक्ष कोठे लावायची याची कल्पना त्यांनी माळ्याला दिली होती. त्यांनी दिल्लीहून अशोक वृक्ष व इतर काही वृक्ष मागवून घेतली होती. ती वृक्षे त्यांनी आपल्या बागेत लावली. त्यांना भेटण्यासाठी कोणी अनुयायी आला तर ते त्याला "आधी एक वृक्ष कॉलेजच्या आवारात लावून ये तरच तुला भेट मिळेल," अशी पूर्वअट घालूनच त्याला भेट दर्शन देत असत. बाबासाहेबांच्या या उपक्रमामुळे मिलींद कॉलेजच्या परिसरात अनेक झाडे लावली गेली. पण त्यांच्या पश्चात मात्र या कामात कोणीच लक्ष घातले नाही. त्यामुळे नागसेन वनाला एक सुंदर वन बनविण्याचे त्यांचे स्वप्न अधुरेच राहिले.

कायदेमंत्री असताना बाबासाहेबांचे वास्तव्य दिल्लीला होते. त्यांच्या बंगल्यापासून कंपाऊंडपर्यंत सुमारे १०० यार्डाचे अंतर होते. या विस्तीर्ण आवारात बाबासाहेबांनी बाग लावली होती. बाबासाहेब सायंकाळी घरी आल्यावर आपल्या बंगल्यापुढील बागेत फिरत असत. अमक्या ठिकाणी अमूक झाड लाव अशा सूचनाही ते

माळ्याला करत असत. बागेची मांडणी बाबासाहेब स्वत: आपल्या इच्छेप्रमाणे व मनासारखी करुन घेत असत. आपली बाग ही दिल्लीतील कोणत्याही मंत्र्यापेक्षा सरस असली पाहिजे, असे त्यांना वाटत असे. यासाठी वाटेल तो खर्च करण्याची त्यांची तयारी होती. त्यावेळी दिल्लीतील बाबासाहेबांची बाग म्हणजे एक प्रेक्षणीय स्थळ असल्याचे इतरांनासुद्धा वाटत असे. रस्त्याने जाणारी-येणारी माणसे बागेकडे टक लावून पाहत असत. कोणालाही मोह वाटावा अशीच विलोभनीय ती बाग होती. बाबासाहेबांनी तयार केलेल्या बागेत नानाविध रंगाची, आकाराची व विविध प्रकारची असंख्य फुले, झाडे होती. तसेच वेलीसुद्धा होत्या. नाना तऱ्हेच्या रंगाच्या झाडांची विलोभनीय रुपे पाहताना मन मोहित होत असे. मनाला एक प्रकारची तृप्तता वाटत असे. परदेशातून येणारे कितीतरी प्रवासी बाबासाहेबांच्या बागेचा फोटो घेत असत.

दुसरे महायुद्ध सुरु असताना ब्रिटीश सैनिक व अमेरिकन टॉमीज नव्या दिल्लीकडे इकडे तिकडे फिरत असत. त्यांच्यापैकीही काहीजण बागेचा फोटो घेत असत. फुलझाडांच्या बागेची आवड बाबासाहेबांना जशी होती अगदी त्याप्रमाणेच बागेत भाजीपाला पिकविण्याची आवडही त्यांना होती. त्यांच्या बंगल्याच्या मागील बाजूस उत्तम प्रकारच्या भाज्या त्यांनी लावल्या होत्या. चांगल्या प्रतीच्या भाज्यांची लागवड त्यांनी केली होती. आपल्या बागेतील ताजी भाजी दररोज ते जेवणासाठी उपयोगात आणत असत. उद्यान कलेचा एक उत्कृष्ट नमुना अशी त्यांची बाग होती आणि त्या सुंदर विलोभनीय, मनमोहक अशा बागेचे कर्ते स्वत: बाबासाहेब होते. विशेष म्हणजे दिल्लीत व्हाईसरॉयच्या बागेचा पहिला क्रमांक होता तर दुसरा क्रमांक हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बागेचाच होता. नि:संदेह ते उत्कृष्ट बागवान होते.

राजरत्न ठोसर